पर्यावरण विभाग,
पुणे महानगरपालिका
जावक क्र:. ५९८
दिनांक : १६/१०/२६

मा. अंतर्गत अर्थान्विक्षक
पुणे महानगरपालिका

यांसकडे...

विषय : ठराव टाकून मिळणेबाबत
संदर्भ : खात्याचे निवेदन जावक क्र. ५९७ दि.१६/१०/२०२६
प्रदूषण व फटाकेविरहित पर्यावरणपूरक दिवाळीसाठी नागरिकांना आवाहन करणेबाबत.

प्रस्तुत प्रकरणी मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ) यांची स्वाक्षरी झाली असून त्यांचे मान्यतेचा ठराव टाकून मिळणेस विनंती आहे.

मा.स.कळावे.

(राखी चौधरी)
उप अभियंता, पर्यावरण विभाग
पुणे महानगरपालिका

नि - 3





पर्यावरण विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र.: -५९७
दिनांक: -१६/१०/२०२६

६

मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (इ)
पुणे महानगरपालिका

यांजकडेस सविनय सादर .....

विषय:- प्रदूषण व फटाकेविरहित पर्यावरणपूरक दिवाळीसाठी नागरिकांना जाहीर आवाहन करणेबाबत.

मा. महोदय ,

पुणे महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरिकांना दिवाळी हा सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सण साजरा करताना नागरिकांना हवा प्रदूषण तसेच ध्वनी प्रदूषण यांसारख्या उद्भवणाऱ्या समस्यांना आळा घालण्याकरिता पर्यावरणपूरक पद्धतीने उत्सव साजरा करणेसाठी नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

तरी, सदर आवाहनाच्या प्रेस नोटवर आपली स्वाक्षरी होणेस नम्र विनंती आहे.

मा.स. कळावे.

(माधव जगताप)
उप आयुक्त, पर्यावरण विभाग
पुणे महानगरपालिका

मा.अ
Give publicity by all means possible

(प्रजित नायर) भा.प्र.से.
अतिरिक्त महापालिका आयुक्त(इस्टेटस)
पुणे महानगरपालिका

अति. महा. आयुक्त (इस्टेटस) कार्यालय
पुणे महानगरपालिका
आवक क्र. 3000 दि. १६/१०/२६
जावक क्र. 3200 दि. १६/१०/२६

पर्यावरण विभाग
पुणे महानगरपालिका
आवक क्र. ६०२ दि. १६/१०/२०२६
जावक क्र ५९८ दि १६/१०/२०२६

नि-१

दिनांक: २६/१०/२०२६

नागरिकांना जाहीर आवाहन
प्रदूषण व फटाकेविरहित पर्यावरणपूरक दिवाळी साजरे करणे

पुणे महानगरपालिकेमार्फत शहरातील नागरिकांना दिवाळी हा सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. दिवाळी हा सण अंधार दूर करून प्रकाश निर्माण करणारा दीप मांगल्याचे प्रतिक मानला जातो. दिवाळी सण साजरा करताना हवा प्रदूषण तसेच ध्वनी प्रदूषण यांमुळे उद्भवणाऱ्या समस्यांना आळा घालण्याकरिता पर्यावरणपूरक पद्धतीने हा उत्सव साजरा करावा यासाठी नागरिकांना खालील प्रमाणे आवाहान करण्यात येत आहे.

हवा प्रदूषण :

- फटाके हे वायू प्रदूषणास कारणीभूत ठरतात, तरी शहरातील हवेचे प्रदूषण कमी करण्यासठी प्रत्येक नागरिकांनी फटाक्यांचा वापर करणे टाळावे.
- दिवाळी काळात फटाके फोडल्यामुळे प्रदूषणाचे प्रमाण जास्त होऊन श्वसनसंस्थेवर दुष्परिणाम होतात, विशेषतः मुले, वृद्ध आणि श्वसनविकारग्रस्त व्यक्तींच्या आरोग्याला धोका निर्माण होतो तसेच श्वसनाचे आजार होवू शकतात यासाठी जास्त धूर उत्सर्जित करणाऱ्या फटाक्यांचा वापर करणे टाळावे.

ध्वनी प्रदूषण :

- ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी मोठ्या आवाजाचे फटाके यांचा वापर टाळावा.
- दिवाळीत १२५ डेसिबलपेक्षा जास्त आवाज करणारे फटाके उडविणास मनाई केली आहे, तरी यांसारखे फटाके उडविणे टाळावे.
- नागरिकांनी शांतता क्षेत्र जसे की शैक्षणिक संस्था, दवाखाने, न्यायालये इ. ठिकाणच्या परिसरात फटाके उडवू नये.

पर्यावरणपूरक पर्याय :

- नागरिकांनी घर सजविण्यासाठी अधिक ऊर्जा कार्यक्षम प्रकाश देणारे LED दिवे किंवा अपारंपारिक ऊर्जा स्रोत जसे की सौर दिवे वापरावेत.
- प्लास्टर ऑफ पॅरीस (Plaster of Paris) पासून बनवलेले किल्ले पर्यावरणास घातक ठरतात त्यांचा वापर न करता दगड मातीपासून किल्ले बनवावेत.
- रासायनिक रंग / रांगोळी न वापरता रांगोळीकरीता पर्यावरणपूरक साहित्यांचा वापर करावा.
- प्लास्टिकचे आकाशकंदील न वापरता पर्यावरणपूरक किंवा रिसायकल करता येणाऱ्या वस्तूंपासून बनलेले आकाशकंदील वापरुन इको फ्रेंडली सजावट करावी.
- सजावटीसाठी तसेच भेटवस्तू देताना एकेरी प्लास्टिकचा वापर टाळावा, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार कराव्यात.
- शाळा, महाविद्यालये व नागरिक संघटना यांनी "नो क्रॅकर दिवाळी" जनजागृती मोहीम राबवावी.
- दिवाळी पूर्वी व दिवाळी नंतर स्वच्छता मोहिमेमध्ये सहभागी व्हावे.

"स्वच्छ पुणे, निरोगी पुणे" याकरिता नागरिकांनी प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करावी.

(प्रजित नायर)
अति. महापालिका आयुक्त (इ)
पुणे महानगरपालिका

सवि-